# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

## आरे कारशेडच्या प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकारचं काम हाती घेतलेलं नाही – रणजित सिंह देओल, व्यवस्थापकीय संचालक, मुं. मे. रे. कॉ.

### प्रतिबंधित क्षेत्राबाहेर नवी ट्रेन उतरवून घ्यायची व ट्रेनची चाचणी करण्याची तयारी सुरु आहे

मुंबई, २ मार्च,२०२२ -
"आरे कारशेडच्या प्रतिबंधित क्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकारचं काम हाती घेतलेलं नाही", असे श्री. रणजित सिंह देओल, व्यवस्थापकीय संचालक , मुं. मे. रे. कॉ. यांनी स्पष्ट केलं आहे. विविध वर्तमानपत्रांनी या संदर्भात बातम्या प्रसिद्ध केल्या वर श्री.देओल प्रतिसाद देत होते. "या बातम्या दिशाभूल करणाऱ्या आहेत. कारण प्रतिबंधित क्षेत्राबाहेर म्हणजेच मरोळ-मरोशी रोडच्या पश्चिमेला असणाऱ्या रॅम्पच्या सुरुवातीलाच आम्ही एक तात्पुरती सुविधा निर्माण करीत आहोत. मार्च महिन्याच्या शेवटी एक ट्रेन येणे अपेक्षित आहे. ती ट्रेन याच तात्पुरत्या सुविधेमध्ये उतरवून घेण्यात येणार आहे आणि त्यानंतर ट्रेनच्या चाचण्या घेण्यात येणार आहेत. ट्रेनची चाचणी विविध मानकांवर होणार आहे. दहा हजार कि.मी. अंतराच्या चाचणीदरम्यान स्पीड, ऑस्सिलेशन, इमर्जन्सी ब्रेक डिस्टन्स अशा चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्या तात्पुरत्या सुविधेपासून सुरु होऊन भुयारांमध्ये घेण्यात येणार आहेत", श्री. देओल म्हणाले.

श्री. देओल पुढे म्हणाले, "प्रोटो-
टाईप ट्रेनच्या चाचण्या या ठिकाणी घेण्यासाठीची आवश्यक मंजुरी राज्य शासनाने दिलेली आहे.

कुठल्याही प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या बातम्या प्रसिद्ध करण्यापूर्वी प्रसिद्धी माध्यमांनी बातमीची पूर्ण खातरजमा करावी असं आवाहन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे करण्यात आलं आहे. ***(समाप्त)***


For further information please contact: -

| | |
|---|---|
| Vaidehi More/Sr. AGM(PR) | Niti Tamse/AM(PR) |
| 9028543087 | 8369727364/9664215544 |
| vaidehi.more@mmrcl.com | niti.tamse@mmrcl.com |